# वसई-विरार शहर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम

दि.३१/०३/२०२२

<u>प्रेसनोट</u>

**<u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मोफत बस प्रवास योजनेअंतर्गत जेष्ठ नागरिक, दिव्यांग, कॅन्सरपिडीत, रक्त शुद्धीकरण करून घेणारे नागरिक यांना देण्यात आलेल्या मोफत बस प्रवासात १ महिन्याची मुदतवाढ</u>**

वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेमार्फत महानगरपालिका हद्दीतील जेष्ठ नागरिक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुद्धीकरण (डायलेसीस) करून घेणारे नागरिकांकरिता **"मोफत बस प्रवास योजना"** राबविण्यात येत आहे. सदर मोफत बस प्रवास योजना कोरोनाच्या कालावधीमध्ये बंद होती व दि.०१ ऑगस्ट, २०२१ रोजीपासून ती योजना पुन:श्च सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या पासची मुदत दि.३१ मार्च,२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे.

मोफत बस पासचे नूतनीकरण लाभार्थ्यांना त्वरीत करणे शक्य होणार नाही. या बाबीचा विचार करून या कल्याणकारी योजनेचा लाभ निरंतर लाभार्थ्यांना मिळणेकरिता मा.आयुक्त तथा प्रशासक, श्री.अनिलकुमार पवार यांनी दि.३१ मार्च, २०२२ पर्यंतच्या मोफत बस पासच्या मुदतीस **दि.३० एप्रिल, २०२२ रोजीपर्यंत मुदतवाढ** देण्यास मान्यता दिलेली आहे.

सदर योजनेचा लाभ घेणेसाठी लाभार्थ्यांनी नूतनीकरणाचे व नवीन अर्ज आपल्या जवळील प्रभाग समिती कार्यालयामार्फत उपलब्ध करून घ्यावे. पास नूतनीकरणाचा/ नवीन अर्ज भरून दि.२० एप्रिल, २०२२ रोजीपर्यंत नजीकच्या प्रभाग समितीमध्ये जमा करावे व "मोफत बस पास" प्राप्त करून सदर योजनेचा लाभ घ्यावा.

**परिवहन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**